**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१.**
Web : www.dhepune.org.in E-mail : budget.dhepune@nic.in

फोन नं. ०२०/२६१२२१११९, २६१३०६२७, २६१२४६३९ फॅक्स नं. ०२०/२६१११११५३

क्र. - अर्थसं - २०१६ /(०१३/१६) वायो/ लेखा २ दि. १० जून २०१६

प्रति,

प्राचार्य / संचालक,

१. सर्व शासकीय अध्यापक महाविद्यालये,
२. सर्व शासकीय कला महाविद्यालये/संस्था.
३. सर्व शासकीय विज्ञान महाविद्यालये/संस्था.
४. शासकीय वाणिज्य महाविद्यालये मुंबई
५. शासकीय विधी महाविद्यालय मुंबई .
६. सर्व शासकीय न्यायसहाय्यक विज्ञान संस्था
७. सर्व भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण केंद्रे
८. विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), सर्व विभाग,
९. अधिक्षक शासकीय महाविद्यालये मुलांचे वसतिगृहे मुंबई,
१०. अधिक्षिका, सावित्रीदेवी फुले महिला छात्रालय मुंबई
११. लेखाधिकारी, पनवेल व सोलापूर

**विषय - सन २०१६-१७ मध्ये नवीन खरेदी साठी पशासकीय मान्यता घेण्याकरीता सूचना निर्गमित करण्याबाबत**

सदंर्भ - १. या कार्यालयाचे पत्र क्र. क्र. - अर्थसं - २०१६ /(५/१६) वायो/ लेखा २ दि. २५ एप्रिल २०१६
२. शासन पत्र क्र. प्रशामा २०१६/(१०३/१६)/ मशि -३ दि ३ मे २०१६

उपरोक्त विषयाबाबत सोबत सादर करण्यात आलेले दि.३ मे २०१६ चे शासन पत्र अवलोकन व्हावे. सदरहू पत्रान्वये शासनाने सन २०१६-१७ मधील खरेदी प्रस्ताव विहित वेळेत, आवश्यक त्या कागदपत्रासह सादर करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

योजनांतर्गत योजनेसाठी महाविद्यालय / संस्था/ वसतिगृहे / कार्यालये यांना सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी योजना व उद्दिष्टनिहाय मंजूर करण्यात आलेली तरतुदीची माहिती संदर्भ पत्र क्र. १ अन्वये देण्यात आलेली आहे. या पत्रासोबत खरेदी प्रस्ताव सादर करण्याबाबत सविस्त्र सूचना तसेच खरेदी प्रस्ताव सादर करण्याचे वेळापत्रक देण्यात आलेले आहे. या वेळापत्रकानूसार दि.१० ऑगस्ट २०१६ पर्यत खरेदीचे सर्व प्रस्ताव संचालनालयास सादर करण्यात यावेत.

खरेदी प्रस्ताव सादर करताना संदर्भ क.१ व २ अन्वये देण्यात आलेल्या सूचनाचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

(डॉ. धनराज माने )
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत,
१.मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय विस्तार भवन मुंबई ३२ यांना माहितीस्तव सविनय सादर
२.विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण सर्व विभाग -यांनी त्यांच्या अखत्यारितील संस्था /कार्यालय महा. यांना उपरोक्त तरतुदीबाबत कळविण्यात यावे.

शिक्षण संचालनालय
(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१.
- 5 MAY 2015
आवक क्रमांक:- 10102
शाखा:- उशि-2

महाराष्ट्र शासन

क्रमांक : प्रशामा-२०१६/(१०३/१६)/मशि-३,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०३ मे, २०१६.

प्रति,
संचालक,
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य,
पुणे.

विषय :- सन २०१६-१७ मध्ये नवीन खरेदीसाठी प्रथम प्रशासकीय मान्यता घेण्याकरीता सूचना निर्गमित करण्याबाबत.

आपल्या संचालनालयाच्या तसेच संचालनालयाच्या अखत्यारीतील विविध शासकीय कार्यालये, महाविद्यालये व संस्था यांच्याकडून कार्यालयीन तसेच प्रयोगशाळा, इत्यादी प्रयोजनार्थ सामुग्री / उपकरणे / यंत्रसामुग्री इत्यादींची खरेदी करण्यात येते. संबंधीत कार्यालये, महाविद्यालये व संस्था या वित्त विभागाकडील वित्तीय अधिकार नियम पुस्तिकेतील त्यांना प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार वित्तीय मर्यादेत नसलेल्या बाबींच्या खरेदीसाठी आर्थिक वर्षाच्या उत्तरार्धात तसेच वर्ष अखेरीस मान्यतेसाठी (प्रशासकीय व खरेदीच्या) प्रस्ताव आपल्याकडून शासन स्तरावर या विभागाला सादर करण्यात येतात असे आढळून आले आहे. आर्थिक वर्षाच्या उत्तरार्धात तसेच वर्ष अखेरीस प्राप्त झालेल्या अशा प्रस्तावांची पुरेशी छाननी करणे व त्यांना मान्यता देणे जिकिरीचे होते. अनेक वेळा प्रस्तावातील त्रुटी तसेच इतर बाबींची पुर्तता नसल्याने प्रस्ताव मान्यतेअभावी निधी उपलब्ध असून आवश्यकता असलीतरी खरेदी करता येत नाही व निधी अखर्चीत राहतो.

शासकीय विभागांनी करावयाच्या खरेदीसाठीची कार्यपध्दती, उद्योग ऊर्जा व कामगार विभागाकडील शासन निर्णय क्रमांक :- भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, दि.३०.१०.२०१५ अन्वये विहित करण्यात आली आहे. त्यानुसार विहित करण्यात आलेले सुधारीत खरेदी धोरण (नियमपुस्तिकेसह) अंमलात आले आहे. सदर शासन निर्णयातील परिच्छेद ११ नुसार नियमपुस्तिकेच्या परिच्छेद ३.१.१.२ नुसार खरेदीदार प्रशासकीय विभागांनी / कार्यालयांनी कोणतीही खरेदी करण्यापुर्वी प्रशासकीय आदेश काढल्यानंतरच खरेदी प्रक्रिया अवलंबविण्यात यावयाची आहे. तसेच प्रशासकीय आदेशातच खरेदीची आवश्यकता व खरेदी केलेल्या वस्तूंचा विनियोग तातडीने केला जाणार आहे, असे प्रमाणित करावयाचे आहे. सदर प्रशासकीय मान्यता ही वित्तीय नियमावली नुसार असलेल्या वित्तीय मर्यादेपर्यंत देण्यात यावयाची आहे.

सन २०१६-१७ करीता अर्थसंकल्पीत करण्यात आलेला निधी वितरीत करणेबाबत वित्त विभागातील शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१६/प्र.क्र.८९/अर्थ-३, दि.२०.०४.२०१६ अन्वये सूचना निर्गमित करण्यात आल्या असून एकूण वार्षीक अर्थसंकल्पीत तरतूदीच्या ८० टक्केच्या मर्यादेत अर्थसंकल्प अंदाज, वितरण व सनियंत्रण (BEAMS) प्रणालीवर निधी वितरीत करण्यात येणार आहे. आपल्या संचालनालयसह राज्यातील विविध शासकीय कार्यालये, महाविद्यालये व संस्था यांना उपरोक्त खरेदीसाठी उपलब्ध होणारा निधी विचारात घेऊन वरील नमूद - खरेदी धोरण / कार्यप्रणाली तसेच वित्तीय अधिकार यांच्या अनुषंगाने कार्यालयीन तसेच प्रयोगशाळा, इत्यादी प्रयोजनार्थ सामुग्री / उपकरणे / यंत्रसामुग्री इत्यादींची खरेदीसाठी वित्तीय मर्यादेनुसार प्रथम प्रशासकीय मान्यता निर्गमित करण्यात यावेत व तदनंतर सदर मान्यतेच्या अनुषंगाने खरेदी प्रक्रिया अवलंबण्यात यावी.

तसेच वित्तीय अधिकार नियम पुस्तिकेतील वित्तीय मर्यादेनुसार उपरोक्त खरेदी करीता ज्याठिकाणी या म्हणजे प्रशासकीय विभागाच्या प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता आहे, अशा प्रकरणी विहितप्रमाणे सविस्तर माहितीसह परिपूर्ण प्रस्ताव विलंब न करता मान्यतेसाठी शासनास तथा या विभागास सादर करण्यात यावेत.

त्याचबरोबर असेही स्पष्ट करण्यात येते की, प्रशासकीय मान्यतेनंतर खरेदीच्या मान्यतेसाठीचे प्रस्ताव परिपूर्णरित्या (योग्य छाननी करून व कागदपत्रांसह) खरेदी करण्यासाठी वित्त विभागाची कालमर्यादा विचारात घेऊन पुरेसे लवकर सादर करण्यात यावेत.

( महेंद्र पाटील )